**प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी, गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर, महाराष्ट्र यांच्या सोलापूर जिल्ह्यातील तालुका- अक्कलकोट, मोहोळ मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, माढा आणि पंढरपूर येथील प्रस्तावित १३ (तेरा) रेती घाटांच्या जाहिर लिलावासाठी पर्यावरणविषयक अनुमती प्राप्त करण्यासाठी आयोजित केलेल्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीबाबतचे इतिवृत-**

प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी, गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर, महाराष्ट्र यांच्या सोलापूर जिल्ह्यातील तालुका- अक्कलकोट, मोहोळ मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, माढा आणि पंढरपूर येथील प्रस्तावित खालील १३ (तेरा) रेती घाटांच्या जाहिर लिलावासाठी जसे की -

| **अ.क्रं.** | **नदी** | **रेती घाटाचे नांव** | **तालुका** | **जिल्हा** | **गट नं.** | **क्षेत्र (हेक्टरमध्ये)** |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | भीमा | खानापूर | अकक्लकोट | सोलापूर | २२५ ते २६६ | ४.८८ |
| २) | भीमा | कुडल | अकक्लकोट | सोलापूर | ७२ ते ९० | ४.५० |
| ३) | भीमा | देवी कवठे | अकक्लकोट | सोलापूर | ९,८/ब, ७/ब, ६, २ | ३.७५ |
| ४) | भीमा | मिरी तांडोर | मोहोळ मंगळवेढा | सोलापूर | मिरी-५५ ते ५८, तांडोर - २०३ पै, २०५,२०७, २०८,२०९, २१३,२१४ | ४.४५ |
| ५) | भीमा | बाळगी | दक्षिण सोलापूर | सोलापूर | १ ते २५ | ३.१८ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६) | भीमा | भंडारकवठे | दक्षिण सोलापूर | सोलापूर | ८२९, ७९१ ते ७९७ | ४.२० |
| ७) | भीमा | लवंगी | दक्षिण सोलापूर | सोलापूर | ११५,१४८ व १५७ | २.२९ |
| ८) | भीमा | माळेगाव | माढा | सोलापूर | ६०,६१/ब,७० ते ७२, ८१, ८८ | १.६३ |
| ९) | भीमा | आलेगाव (खु) | माढा | सोलापूर | ९२ ते ९७, १०० ते १०२, १०४, १०८, १०९, ११०, ११३ | ४.८३ |
| १०) | भीमा | टाकळी (टे) | माढा | सोलापूर | १५७, १६० ते १६५, १६८ ते १७०, १७५, १७६, १८०, १८१, १८५ ते १९० | ४.७५ |
| ११) | भीमा | गार अकोले | माढा | सोलापूर | ३८,४० ते ४३, ४७ ते ४९, | ४.७२ |
| १२) | भीमा | आव्हे | पंढरपूर | सोलापूर | ४६ ते ५४, ५६,५७,५९, ६०,६१ | ३.७८ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३) | भीमा | नांदोरे | पंढरपूर | सोलापूर | १८७ ते १८९, १९३ ते २००, ७७, २०१, २०२ | ३.३६ |

पर्यावरणविषयक अनुमती प्राप्त करण्यासाठी आयोजित केलेल्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता जिल्हा नियोजन भवन, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. निखिल मोरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा सदस्य, आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सोलापूर बैठकीस आले असताना त्यांचे स्वागत केले.

सदस्य, आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. कुमार आशिर्वाद , जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, निवासी जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, सर्व उपस्थित गावातील तहसीलदार, सरपंच, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना क्रं. १५३३, दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार तसेच

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र संकीर्ण २०१९/प्र.क.०१/तां.क. ०३-१२-२०१९ नुसार पाच हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रफळ असलेले गौण खनिज (वाळू गट) बी-१ संवर्गात समाविष्ट केल्याने अशा प्रकल्पांना राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (SEIAA), पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री. निखिल मोरे, सदस्य, आयोजक यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास जिल्हा खनिकर्म अधिकारी, गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र यांचा सोलापूर जिल्ह्यातील तालुका- अक्कलकोट, मोहोळ मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, माढा आणि पंढरपूर येथील प्रस्तावित १३ (तेरा) रेती घाटांच्या जाहिर लिलावासाठी पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्पामुळे बाधित, विस्थापित होणा-या रहिवाश्यांच्या समस्या जाणून घेणे, प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी पर्यावरणाविषयक जनसुनावणी घेण्यास शुक्रवार, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यास मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६

व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-१०७/२०२४ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी- २४०११७ एफटीएस-०१२२ दिनांक १७-०१-२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी,सोलापूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी- प्रादेशिक अधिकारी,पुणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर - **आयोजक**

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक संचार यात मराठीत व दैनिक वृत्तपत्र दिव्य मराठी यात इंग्रजीत दिनांक ०२-०१-२०२४ रोजी जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या प्रती इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित

शासकीय कार्यालयात जनतेच्या माहितीसाठी आणि अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेल्या होत्याः-

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर,

५) तहसीलदार, तहसील कार्यालय- अक्कलकोट, तालुका - अक्कलकोट, जिल्हा- सोलापूर,

६) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकोट, तालुका - अक्कलकोट, जिल्हा- सोलापूर,

७) तहसीलदार, तहसील कार्यालय- मोहोळ, तालुका - मोहोळ, जिल्हा- सोलापूर,

८) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ, तालुका - मोहोळ, जिल्हा- सोलापूर,

९) तहसीलदार, तहसील कार्यालय- मंगळवेढा तालुका - मंगळवेढा, जिल्हा- सोलापूर,

१०) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंगळवेळा, तालुका - मंगळवेढा, जिल्हा- सोलापूर,

११) तहसीलदार, तहसील कार्यालय- दक्षिण सोलापूर, तालुका - दक्षिण सोलापूर, जिल्हा- सोलापूर,

१२) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर, तालुका - मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, जिल्हा- सोलापूर,

१३ तहसीलदार, तहसील कार्यालय- माढा, तालुका - माढा, जिल्हा- सोलापूर,

१४) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माढा, तालुका - माढा, दक्षिण सोलापूर, जिल्हा- सोलापूर,

१५) तहसीलदार, तहसील कार्यालय- पंढरपूर, तालुका - पंढरपूर, जिल्हा- सोलापूर,

१६) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर, तालुका - पंढरपूर, जिल्हा- सोलापूर,

१७) मौजे - खानापूर, कुडल, देवीकवठे या गावांशी संबधित ग्रामपंचायत कार्यालये, तालुका-अक्कलकोट, जिल्हा-सोलापूर

१८) मौजे - मिरी या गावांशी संबधित ग्रामपंचायत कार्यालये,तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूर

१९) मौजे - तांडोर या गावांशी संबधित ग्रामपंचायत कार्यालये, तालुका- मंगळवेढा, जिल्हा-सोलापूर

२०) मौजे - बाळगी, भंडारकवठे, लवंगी या गावांशी संबधित ग्रामपंचायत कार्यालये, तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूर

२१) मौजे - माळेगाव, आलेगाव (खु), टाकळी (टे), गार अकोले या गावांशी संबधित ग्रामपंचायत कार्यालये, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूर,

२२) मौजे - आव्हे, नांदोरे या गावांशी संबधित ग्रामपंचायत कार्यालये, तालुका-पंढरपूर, जिल्हा-सोलापूर

२३) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२४) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

२५) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जोग सेंटर, २रा व ३रा मजला, वाकडेवाडी, जुना पुणे-मुंबई रस्ता, पुणे - ४११ ००३

२६) उप प्रादेशिक कार्यालय-सोलापूर, ब/४, बाळी बिल्डिंग, सिव्हिल लाईन्स, शासकीय दूध डेअरीसमोर, सात रस्ता, सोलापूर- ४१३ ००३

२७) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई

आयोजक यांनी सांगितले की सदरहू रेती घाटांच्या जाहिर लिलावांसाठी आजपावेतो ०२ निवेदने/पत्रे/तक्रार प्राप्त झालेल्या आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात सादरीकरणानंतर देऊ शकतात असे सांगितले.

सदस्य, आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप ,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

सदस्य, आयोजक यांनी प्रतिपादन केले की, ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद बैठकीच्या इतिवृतात घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा

सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल, बैठकीचे इतिवृत्त आणि ईमेल व्दारे आणि प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप सोबत, जोडून पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठक सुरु करताना श्री. कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सोलापूर बैठकीस आले असताना त्यांचे स्वागत केले.

बैठकीची सुरवात करताना मा. अपर जिल्हादंडाधिकारी यांनी सांगितले की, जिल्हा खनिकर्म अधिकारी, गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर हे काही अपरिहार्य कारणांमुळे उपस्थित राहू शकले नाहित. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा आणि कामगार विभागाच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयानुसार त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक १९ एप्रिल, २०२३ नुसार शासनामार्फत वाळू आणि रेतीचे उत्खनन, साठवणूक आणि ऑनलाईन प्रणालीव्दारे विक्री याच्याबाबतचे सर्वंकष धोरण ठरविण्यात आलेले असून या सर्वकष धोरणानुसार महाराष्ट्रात कोणत्याही ठिकाणी रेतीचे उत्खनन करावयाचे असल्यास आगाऊ पर्यावरण. अनुमती (Environmental Clearance) घेतल्याशिवाय रेतीचे उत्खनन करता येत नाही. त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय आणि मा. राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले निर्देशांनुसार त्याचप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार पर्यावरण अनुमती आणि पर्यावरण व्यवस्थापन योजना यांची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे.

पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्याशिवाय वाळू, रेतीचे उत्खनन करण्यास परवानगी नाही.

मा. अपर जिल्हादंडाधिकारी यांनी सांगितले की, सोलापूर जिल्हयात २०२३-२४ साली जे वाळूचे लिलाव करावयाचे आहेत, त्यासाठी शासनाने जी विहित प्रक्रिया घालून दिलेली आहे, त्यानुसार पर्यावरण अनुमती प्रदान करण्याच्या आधी ज्या ज्या गावात वाळू, रेती घाटाचे लिलाव होणार आहेत, त्याबाबत तेथील ग्रामस्थ, स्थानिक यांचे रेती घाटाच्या लिलावाबाबत काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी ही जाणून घेणे हा या प्रक्रियेचा महत्वाचा भाग आहे. त्यानुसार तालुका स्तरावर कुठे कुठे वाळू उपलब्ध होऊ शकेल यांसाठी तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली रेतीघाट प्रस्तावित करणा-या तांत्रिक समितीने उपविभागीय समितीला अहवाल सादर केल्यानंतर उपविभागीय कार्यालय तो अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करतात. वाळूलिलावासाठी त्या त्या गावांचा होकार, त्यासाठी ग्रामपंचायतीचा मंजूर केलेला ठराव आवश्यक आहे. या तेराही गावांचे ग्रामसभेचे ठराव प्राप्त झालेले आहेत.

त्यांनी सांगितले की, ज्याठिकाणी वाळू उत्खनन व लिलाव करावयाचे आहेत, त्याठिकाणी नदीपात्र्याच्या अवतीभोवतीचा परिसर आणि पर्यावरण यांवर कोणतेही तात्पुरते आणि दूरगामी परिणाम होऊ नये त्यासाठी विविध उपाय अंगिकारणे याचा अहवाल पर्यावरण सल्लागार यांनी सादर केलेला आहे. सदरहू पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (ईआय़ए) हा सोलापूर जिल्हयाच्या एनआयसी संकेतस्थळावर दावे, हरकती, सूचना सादर करण्यासाठी प्रकाशित करण्यात आलेला होता. त्यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व पर्यावरण व्यवस्थापन योजनांविषयी सादरीकरण करण्याची सूचना केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सर्व ग्रामपंचायत कार्यालयांनी सदरहू वाळू लिलावासाठी ना हरकत प्रमाणपत्र सादर केलेले आहेत. वाळू उत्खननाकरिता रेती घाट वाटप झाल्यापासून एक वर्षापर्यंत राहिल.

त्यावेळी मा. अपर जिल्हादंडाधिकारी, यांनी सांगितले की, उत्खननाचा कालवधी हा पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतर जेव्हा लिलाव होतील तेव्हा १० जून पर्यंतचा कालावधी आहे. १० जूनपासून पावसाळ्याचा कालावधी ही वगळण्यात आलेला आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, वाळूच्या ठिकाणाहून स्टॉक यार्डपर्यंत ट्रॅक्टर ट्रॉलीव्दारे वाहतूक केली जाईल. नदीकाठच्या बाजूने आणि वाहतुक रस्त्यालगत वृक्षारोपण करण्यात येणार आहे. मजूरांसाठी खाणीच्या ठिकाणी फिरती शौचालये पुरविली जातील. त्याचप्रमाण पॉलिथिन पिशव्या, ज्यूटच्या पिशव्या इ. टाकाऊ पदार्थ नदीपात्रात टाकू दिले जाणार नाही. या खाणकामामुळे कच-याची निर्मिती होणार नाही. हरित पट्टा विकसित करताना स्थानिक/मूळ प्रजाती लावण्यात येतील.

खाणकामामुळे शासनास अतिरिक्त महसूल (रॉयल्टी) प्राप्त होणार आहे. त्याचप्रमाणे उत्पन्नामुळे खनिज निधीमध्ये वाढ होऊन त्याचा स्थानिक विकासासाठीच उपयोग करण्यात येईल. ध्वनि प्रदूषणाचा त्रास कामगारांना होऊ नये म्हणून ईअर मग्ज/प्लग्ज वापरण्यास देण्यात येईल.

या प्रकल्पामुळे ग्रामस्थांना रोजगाराची संधी उपलब्ध होतील. त्याचप्रमाणे प्रस्तावित प्रकल्प सामाजीक पायाभूत सुविधा आणि प्रदेशाच्या सर्वांगीण विकासासाठीदेखील आशावादी योगदान देईल.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीतर्फे प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन उपस्थितांना करण्यात येते. त्यांनी

सांगितले की, प्रथमच सांगितलेल्याप्रमाणें सदरहू प्रकल्पास मान्यता देणे, प्रकल्प नाकारणे किंवा प्रकल्प प्रलंबित ठेवण्याचा अधिकार **समितीस** नाही. ही समिती प्रकल्प बाधितांचे सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी स्थापन करण्यात आलेली आहे. आयोजक यांनी प्रतिपादन केले की, ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

मा. अपर जिल्हादंडाधिकारी, यांनी वाळूलिलाव ज्या क्रमाने आहेत, त्या क्रमानेच त्या त्या गावातील प्रतिनिधिंनी आपले मत मांडावे असे सूचित केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी खानापूर गावातील ग्रामस्थांना सूचना, आक्षेप नोंदविण्याची संधि पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने दिलेली आहे, तर ती मांडण्याचे आवाहन केले -

१) **श्री. सयफन पटेल, सरपंच, खानापूर ग्रामपंचायत, तालुका-अक्कलकोट, जिल्हा-सोलापूरः-**

गावातील रस्ते खराब न होण्याची जबाबदारी घेण्यात यावी, लोकांना त्रास होऊ नये आणि मानवी बळानेच रेतीचा उपसा व्हावा. त्यामुळे गावातील स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अक्कलकोट तालुक्यातील ग्रामस्थांना सूचना, आक्षेप नोंदविण्याची सूचना केली.

२) **श्री. संगमेश पुजारी, राहणार-कुडल, तालुका-अक्कलकोट, जिल्हा-सोलापूरः-**

रेतीघाट लिलाव करण्यासाठी आमची हरकत नाही. मात्र पूर्वीचा अनुभव असा आहे की, कंत्राटदार शासकीय सूचना, निर्देश यांचे कोणतेच पालन करत नाही. किंबहुना मानवी बळाच्या ऐवजी जेसीबीच्या सहाय्याने वाळूचे उत्खनन करतात. त्यांना सांगण्यास गेलो की, ते आम्ही टेंडरप्रमाणे काम करतो असे सांगतात. तरी बैठकीत दिलेल्या निर्देशांचे पालन करणे बंधनकारक केल्यास आमची रेतीलिलावास कुठलीच हरकत नाही.

आयोजक यांनी देवीकवठे, तालुका-अक्कलकोट आणि मिरी तांडोर, तालुका-मोहोळ मंगळवेढा, बाळगी, भंडारकवठे, तालुका-दक्षिण सोलापूर येथील ग्रामस्थांना त्यांच्या सूचना/ आक्षेप मांडण्याची विनंती केली.

३) **श्री. भीमाशंकर कल्लप्पा मुरलीश्वर, सरपंच, भंडारकवठे ग्रामपंचायत, तालुका–दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-**

यांनी रेतीघाट लिलावास मान्यता दिल्याचे सांगितले. मात्र वाहतुक करताना वाहनाच्या क्षमतेपेक्षा जास्त वाळू वाहून नेऊ नये असे सांगितले.

आयोजक यांनी लवंगी, तालुका-दक्षिण सोलापूर ग्रामस्थांना सूचना/आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

४) **श्री. संगमेश पाटील, सरपंच, लवंगी ग्रामपंचायत, तालुका - दक्षिण सोलापूर, जिल्हा - सोलापूरः-**

वाळू उत्खनन करणे गरजेचे आहे.

आयोजक यांनी माळेगाव, तालुका- माढा, टाकळे (टे), गारअकोले, तालुका-माढा ग्रामस्थांना सूचना/आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

आयोजक यांनी आव्हे, नांदोरे, तालुका - पंढरपूर ग्रामस्थांना सूचना/आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांना सर्व उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

त्यावेळी **श्री. सयफन पटेल, सरपंच, खानापूर ग्रामपंचायत, तालुका-अक्कलकोट, जिल्हा-सोलापूर** यांनी हरकत नोंदविली की,
२०१४-१५, २०१५-१६ ला रेतीघाटांचा लिलाव झालेले होते (टेंडर). त्यातील ग्रामपंचायतीस शासनाकडून निधी अद्‌याप पावेतो उपलब्ध झालेला नाही. त्यासाठी वारंवार पाठपुरावा करुनही अजून निधी उपलब्ध झालेला नाही. तरी संबंधित निधी त्वरित ग्रामपंचायतीस अदा करण्यात यावा.

**५) <u>श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, तेलंगणाः-</u>**

त्यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस बोलण्याची विनंती केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. रेड्डी यांना थोडक्यात त्यांचे मुद्दे उपस्थित करण्याची सूचना केली. श्री. रेड्डी यांनी सांगितले की, मी एक पर्यावरणवादी आहे. माझ्या मते नदी वाळू ही नूतनीकरणाची/अक्षय खाणच आहे. ही जगातील अक्षय खाण आहे. दरवर्षी पावसाचे लाखो लिटर पाणी नदीत येते. नदीत सुमारे ३० टक्के वाळू साचते. वाळू गोळा करणे/उत्खनन करणे ही एक महत्त्वाची बाब आहे. त्यास मी पाठिंबा देतो, कारण जर तुम्ही वाळू गोळा केली नाही तर ती टाक्यांमध्ये, जलाशयांमध्ये जाईल.

भारतात, अंदाजे दरवर्षी, वाळूमुळे पाणी धारण करण्याच्या क्षमतेचे २% नुकसान होत आहे. दुसरी गोष्ट म्हणजे वाळू उत्खनानात फिल्टर वाळू घेण्यात येत नाही.

मी इथे सुचवत आहे की, जनसुनावणीत जल, वायू आणि जमीन प्रदूषणाचा प्रश्न आहे. येथे ड्रिलिंग किंवा ब्लास्टिंग नाही. वाहतूक खूप हलक्या घटकांची आहे. यासाठी कोणत्याही यंत्रसामग्रीची आवश्यकता नाही.

तरी माझी भारत सरकारला विनंती आहे की, वाळू उत्खनन प्रक्रियेसाठी जनसुनावणी आयोजित करण्याबाबत सूट देण्यात यावी.

वाळू उपसा समाजासाठी आवश्यक आहे. सरकारी कामासाठी वाळूचा वापर अत्यावश्यक असल्याने प्रकल्पास लवकरात लवकर परवानगी देण्यात यावी, अशी माझी विनंती आहे. हरित पट्टा विकसित करताना सामान्य वनस्पतींऐवजी औषधी मूल्याची झाडे आणि फळ देणारी झाडे लावण्यात यावीत. समाजास ती खूपच उपयुक्त ठरेल.

तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी गावातील प्रतिनिधींसोबत, गावक-यांसोबत CSR निधी खर्च करण्यासाठी गावकऱ्यांसोबत एक समन्वय समिती स्थापन करण्याची विनंती करतो. जनतेला आवश्यक असणारी सामाजिक कामे (Demand Oriented Work) हाती घेण्यात यावी. त्यामुळे जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांवर मोठी विश्वासार्हता येईल.

कृपया पावसाचे पाणी साठवण्याचा विचार करण्यात यावा व सदरहू मुद्द्याची नोंद EIA अहवालात समाविष्ठ करण्यात यावी. वाळूपट्ट्यांच्या लिलावास परवानगी देण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

मा. अपर जिल्हादंडाधिकारी, यांनी काही कारणांमुळे एखाद्या गावातील ग्रामस्थांना वेळेवर पोचणे शक्य झालेले नसेल, तरी जनसुनावणी बैठकीची प्रक्रिया अजून दहा मिनिटे सुरु ठेवण्याची सूचना केली.

मा. अपर जिल्हादंडाधिकारी यांनी सांगितले की, ज्यांना लेखी सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आहे, त्यांनी आज संध्याकाळ ६.०० वाजेपर्यंत उप प्रादेशिक अधिकारी,

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांच्या ईमेलवर ते सादर करु शकतात. त्याचप्रमाणे टपालव्दारेसुध्दा सादर करु शकता. सदरहू सूचना, आक्षेप सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, बैंठकीच्या इतिवृतांसोबत शासनास सादर करण्यात येतील. दहा मिनिटे वाट पाहिल्यानंतर असे निदर्शनास आले की, कोणतीही नविन व्यक्ती अथवा समुह जनसुनावणीसाठी आलेला नाही. अध्यक्ष यांनी आयोजक यांना बैठकीचा समारोप करण्याची सूचना केली.

बैठकीचा समारोप करताना, सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आजच्या जनसुनावणी बैठकीत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने उपस्थितांना सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी मांडण्याची पुरेशी संधि, वेळ देण्यात आलेली आहे.

उपस्थितांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी त्यांच्या काही सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी असल्यास त्या लेखी किंवा तोंडी सादर करण्याचे परत आवाहन करण्यात आले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजक यांनी सागितले की, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सर्व सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी याची नोंद घेण्यात आलेली आहे. त्याचा इतिवृतात समावेश करुन ते इतिवृत अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह मा. अध्यक्षांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्यातर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येतील. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

आयोजक यांनी सर्व उपस्थितांचे जनसुनावणीस राहून आपली मते, सूचना, आक्षेप नोंदविले याबद्दल आभार व्यक्त करुन मा. अध्यक्ष यांच्यावतीने जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

प्राप्त ०२ लेखी निवेदने/पत्रे/तक्रार व जनसुनावणी दरम्यान देण्यात आलेल्या सादरीकरण्याची प्रत सोबत जोडलेले आहेत.

(निखिल मोरे)
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
सोलापूर

(कुमार आशिर्वाद)
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
जिल्हादंडाधिकारी, सोलापूर,
जिल्हा-सोलापूर